पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६०/२०१५
दिनांक : ३०/१०/२०१५

प्रति,

मा......................................
सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दिनांक **०४/११/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०४/११/२०१५** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ४**

दिनांक : **०४/११/२०१५** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०४/११/२०१५** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.३)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) म.न.पा.चा इंद्रायणीनगर से.नं.०१ भोसरी येथील बॅडमिंटन हॉल राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र, पुणे ०६ या संस्थेस दरमहा र.रु.८,९५९/- सेवा शुल्क देऊन (फक्त एक कोर्टचे भाडे) दि.०१/०२/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर ११ महिने कालावधीसाठी चालविणेस मुदतवाढ देणे व दि.०१/०३/२०१४ ते दि.३१/०१/२०१५ अखेर मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०४/११/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) महापौर चषक क्रीडा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव देणेची कार्यवाही करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापनेपासून ते आजतागायत मा.महापौर पदाचा कार्यभार सांभाळलेल्या मा.महापौर यांची नावे ,कालावधी यांची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | मा.माजी महापौर यांची नावे | कालावधी |
|---|---|---|
| १ | मा.ज्ञानेश्वर पांडुरंग लांडगे | दि.२३/३/१९८६ ते १९/३/१९८७ |
| २ | मा.कै.भिकू वाघेरे (पाटील) | दि.२०/३/१९८७ ते ६/६/१९८७ |
| ३ | मा.कै.अरविंद उर्फ नाना शितोळे | दि.१९/६/१९८७ ते १९/३/१९८८ |
| ४ | मा.कृष्णा शंकर उर्फ तात्या कदम | दि.१९/३/१९८८ ते २०/३/१९८९ |
| ५ | मा.कविचंद भाट | दि.२०/३/१९८९ ते २०/३/१९९० |
| ६ | मा.कै.सादबा उर्फ आप्पासाहेब काटे | दि.२०/३/१९९० ते २०/३/१९९१ |
| ७ | मा.कै.प्रभाकर नारायण साठे | दि.२०/३/१९९१ ते ७/३/१९९२ |
| ८ | मा.आझम फकीरभाई पानसरे | दि.७/३/१९९२ ते २०/३/१९९३ |
| ९ | मा.विलास विठोबा लांडे | दि.२०/३/१९९३ ते १९/३/१९९४ |

| | | |
|---|---|---|
| १० | मा.रंगनाथ सदाशिव फुगे | दि.१९/३/१९९४ ते २०/३/१९९५ |
| ११ | मा.संजोग भिकू वाघेरे (पाटील) | दि.२०/३/१९९५ ते २१/३/१९९६ |
| १२ | मा.आर.एस.कुमार | दि.२१/३/१९९६ ते १३/३/१९९७ |
| १३ | मा.सौ.अनिता दत्तात्रय फरांदे | दि.१३/३/१९९७ ते २०/३/१९९८ |
| १४ | मा.हनुमंत भिमराव भोसले | दि.२०/३/१९९८ ते २०/३/१९९९ |
| १५ | मा.कै.मधुकर रामचंद्र पवळे | दि.२०/३/१९९९ ते २४/११/२००० |
| १६ | मा.लक्ष्मण पांडुरंग जगताप | दि.१९/१२/२००० ते १३/३/२००२ |
| १७ | मा.प्रकाश बंडोबा रेवाळे | दि.१३/३/२००२ ते १८/२/२००५ |
| १८ | मा.सौ.मंगलाताई कदम | दि.१८/२/२००५ ते १३/३/२००७ |
| १९ | मा.डॉ.वैशाली घोडेकर (लोंढे) | दि.१३/३/२००७ ते २३/५/२००८ |
| २० | मा.सौ अपर्णा निलेश डोके | दि.६/६/२००८ ते ३०/११/२००९ |
| २१ | मा.योगेश मंगलसेन बहल | दि.१/१२/२००९ ते १३/३/२०१२ |
| २२ | मा.सौ.मोहिनीताई विलास लांडे | दि.१३/३/२०१२ ते १२/९/२०१४ |
| २३ | मा.सौ.शकुंतलाताई भाऊसाहेब धराडे | दि.१२/९/२०१४ पासून |

वरील प्रमाणे दि.२३/३/१९८६ ते आजतागायत (दि.७/८/२०१५)अखेर एकूण २३ सन्माननिय नगरसदस्य यांनी महापौर पद भूषविलेले आहे. तरी महापौर चषक क्रीडा स्पर्धेस एका खेळाला एका महापौरांचे नाव देणेस, तसेच जस जशा महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील,तस तशा स्पर्धेस प्रस्तावात नमुद प्रमाणे मा.माजी महापौर यांचे नाव अ.क्र.नुसार देणेस, मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभेमार्फत, मा.स्थायी समिती सभेची व मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महापौर चषक क्रीडा स्पर्धेस एका खेळाला एका महापौरांचे नाव देणेस, तसेच जस जशा महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील, तस तशा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव अ.क्र.नुसार देणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०४/११/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.३) थेरगांव येथील बोट क्लब करिता कयाकिंग व कनोईंग बोट खरेदी मे.महिंद्र डिफेन्स नेव्हल सि.प्रा.लि. ता.खेड, पुणे – ४१० ५०१ यांचेकडून एकूण रक्कम रुपये – १,६४,८५०/- ( अक्षरी र.रु.एक लाख चौसष्ट हजार आठशे पन्नास फक्त ) खरेदी करणेत आलेले असलेने सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागांतर्गत नव्याने सुरु करण्यात येणा-या चिंचवड येथील स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांकरीता एम.पी.एस.सी/यु.पी.एस.सी.ची नविन पुस्तकांची खरेदी करणेकामी सार्वजनिक वाचनालय विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.३

जा.क्र.सावा/२/कावि/१२४/२०१५ दिनांक १३/०८/२०१५ अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर स्पर्धा परीक्षा केंद्राकरीता पुस्तक खरेदी करणेकामी पुरवठाधारकाकडून निविदा / कोटेशन मागविले असता ३ पुरवठाधारकांकडून निविदा भरल्या असून समृध्दी एजन्सी पुणे २५% , चैतीली प्रकाशन २६% सुट दिली असून, नर्मदा प्रकाशन पुणे यांनी नविन पुस्तक खरेदीवर सर्वाधिक २७% सुट दिली आहे. त्यानुसार नर्मदा प्रकाशन पुणे यांचेकडून चिंचवड येथे नव्याने सुरु करण्यात येणा-या स्पर्धा परीक्षा केंद्राकरीता एकूण ७५६ नविन पुस्तके खरेदी करणेकामी अंदाजे र.रु.१,९७,८०८/- (अक्षरी र.रु.एक लाख सत्याण्णव हजार आठशे आठ फक्त) इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. तरी नर्मदा प्रकाशन, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार चिंचवड येथील अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा केंद्रास पुस्तक खरेदीवर २७% सुट देऊन अंदाजे र.रु.१,४४,४००/- (अक्षरी र.रु.एक लाख चव्वेचाळीस हजार चारशे फक्त) ची स्पर्धा परीक्षांची पुस्तके खरेदी करणेस व सदरचा खर्च “ पुस्तके नियतकालिके व लेखे ” या लेखाशिर्षातून अदा करणेस कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६०/२०१५
दिनांक : ३०/१०/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.